


**प्रश्न : ब्रम्हज्ञानी पुरुष सुद्धा जर संसारात राहिला तर त्याला मुक्ती न मिळता तो जन्ममरणाच्या चक्रात सांपडण्याचा संभव असतो असे म्हणतात, याला कारण कोणते ?**

**उत्तर :** संसारात आसक्त झालेली सर्व सामान्य माणसे जन्म - मृत्युच्या चक्रात सापडतातच, परंतु ब्रम्हतत्वाचे ज्ञान झालेला योगी पुरुष सुद्धा जर संसारात राहिला तर विषापेक्षाहि अधिक दुःखदायी ठरणारी वासना ब्रम्हज्ञानी पुरुषाला जन्ममरणाच्या फेऱ्यात ढकलण्यास कारणभूत होते. **संसारात राहिलेल्या योग्याचे मन निरनिराळ्या वासनांमुळे विषयांकडे वळते, व मिथ्या कामनेत उन्मत्त होवून त्या ब्रम्हज्ञानी पुरुषाला यथार्थ ज्ञानापासून वंचित करते.** वासना म्हणजे कोणत्याही गोष्टीचा विचार न करता एखाद्या गोष्टीचे दृढ भावनेने ग्रहण करणे! **परमात्म्याच्या साक्षात्काराचे ज्ञान झाल्यावरही मोठ्या प्रयत्नाने, मी आणि माझे अशा वासनांचा नाश केला पाहिजे.** आस्थापूर्वक केलेल्या पौरुष प्रयत्नांच्या द्वारे वासना हळू हळू नष्ट होवून जर ज्ञान्यांची वासनारहित अवस्था होईल तरच अनंत तेजोरुपी परमात्म्याच्या विशुद्ध स्वरुपाचे त्याला दर्शन होईल.

परमेश्वरी साक्षात्कार करून घेणारा महात्मा अत्यंत दुर्लभ असतो काम - क्रोध - लोभ - मोह - मद आणि मत्सर या षड्रिपूंची गाठोडी डोक्यावर घेऊन, परमेश्वराच्या दिव्यमंदिराप्रत पोहचण्यासाठी, वाटचाल करूं पहाणाऱ्या वाटसरूंना थोडेच दिव्य मंदिरात पोचून, तेजोरुपी परमात्म्याचे दर्शन घेण्याचे आपले उच्चत्तम ध्येय साध्य करता येणार आहे ? मुळीच नाही ! जो पर्यन्त संसार बंधनांची ओझी डोक्यावर आहेत, त्यावरील प्रेम नाहिसे होत नाही, त्याच्या मोहापासून सुटका करून घेण्यासाठी आपण तो फेकून देत नाही, तो पर्यन्त त्याला परमात्म्याच्या दिव्य मंदिराचे दरवाजे उघडे होणार नाहीत. सर्व जग हे परमात्म स्वरुप आहे, सर्व ठिकाणी अद्वैय ब्रम्हच आहे, आत्मा आणि परमात्मा एकच आहे, त्याच्यात भेद नाही, हे सर्व जग वासुदेवमय आहे, अशी दृढ खात्री होत नाही, तोपर्यंत ब्रम्ह साक्षात्कार होणे कठीण आहे. **परमात्म्याचा साक्षात्कार हा काही एक दोन वर्षाच्या प्रयत्नाने किंवा थोडेसे प्रयत्न केल्याने**

प. पू. सद्गुरू सिद्धयोगेश्वर महाराज,
११/डी. शं. वि. सोहनी पथ, ज. शं. शेठ रोड,
मुंबई–४०० ००४.

**साध्य होणार नाही.** हे सर्व साध्य होण्यासाठी ब्रम्हज्ञानी पुरुषाने संसारापासून दूर राहून, सर्व वासनांचा त्याग करून सतत आत्मानुसंधानांत राहिले पाहिजे. तसे न करता जर संसारात राहिला तर वासन मुळे विषयांकडे वळून लक्ष चौऱ्यांऐंशीच्या

फऱ्यात अडकण्याचे भय असते. म्हणून ब्रम्हज्ञानी **पुरुष एकांतात राहिला तरच त्याचे मन तृष्णारहित** होऊन संसारातील सर्व उपाधीपासून मुक्त होवून मुक्ती प्राप्त करून घेण्यास समर्थ होईल !

संसारातील निरनिराळ्या तऱ्हेच्या वासनांच्या योगे योगी यथार्थ ज्ञानाला वंचित होण्याची शक्यता असते. **जोपर्यंत वासनाक्षय होत नाही तोपर्यंत कोणताही जीव मुक्त होवू शकत नाही.** संसार हेच सर्व वासनांचे मूळ आहे, व या वासनांच विषयांची वृध्दी करून आत्मानुसंधानापासून वंचित करतात, त्यामुळेच जीवाला देहरुप प्राप्त होऊन जन्ममरणाच्या बंधनात अडकावे लागते. वासनेमुळे मनुष्याची वृत्ती ज्या ज्या ठिकाणी धाव घेते त्या त्या ठिकाणी त्याला कर्मबंधन होते. त्याचप्रमाणे वासनेमुळे मिथ्या कामनेत प्रवृत्त झालेला जीव, आत्मचिंतन न झाल्यामुळे मोक्षापासून पतन पावतो. **वासनायुक्त जीव ज्यावेळी हा देह सोडतो तेव्हा तो मायेत लीन होवून पुन्हा जन्मभरणाच्या चक्रात सापडतो.** म्हणून ज्ञानी पुरुषांनी सुद्धा निकराचे प्रयत्न करून निर्वासनामय झाले पाहिजे, बुध्दीयुक्त अंतःकरणाने होणाऱ्या कर्मफलांचा त्याग केला पाहिजे. तरच त्याला जन्म बंधाच्या उपाधीतून मुक्त होता येईल. सर्व सामान्य मनुष्याच्या बंधनाला या वासना कारण ठरतात, तशाच त्या ब्रम्हज्ञानी पुरुषालासुध्दा बंधनात पाडतात. **वासना शुभ काय ? किंवा अशुभ काय या दोन्ही प्रकारच्या वासना सकाम असतील तर त्या जन्ममरणाच्या बंधनाला कारण होणारच !** ज्ञानी योगीसुद्धा या वासनेमुळे पुन्हा जन्ममरणाच्या फेऱ्यात कसा सापडतो. याबद्दल पुराणकाळी घडलेली एक गोष्ट आहे. ही गोष्ट लक्षात घेतली तर आपल्या सहज लक्षात येईल, कीं, ज्ञानी पुरुषाला सुद्धा या संसारातील शुभ वासनाही कशी जन्ममृत्युच्या बंधनाला कारण ठरते.

**फार पुर्वी जानव्ही नदीच्या काठी वाढलेल्या एका नगरांत महानभक्त कौंडिण्य मुनीचा आश्रम होता.** ते सतत परमेश्वराच्या भक्तित लीन झालेले असायचे व सर्व क्रियांपासून अलिप्त राहून निर्विकार अवस्थेत राहून नित्य आत्मचिंतनात मग्न असत. त्यांच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा द्वैत भाव नसल्यामुळे या संसारातील कोणत्याही प्राण्याबद्दल द्वेष किंवा प्रिती वाटत नसे; ते संपूर्ण अद्वैत सिद्धांती होते, त्यामुळे द्वैत भाव टाकून नेहमी परमात्म्यात रममाण झालेले दिसत. नोकर ज्याप्रमाणे पगाराच्या आशेने काम करतो, तशा प्रकारे कामनेच्या पूर्तीसाठी भक्ति करणे म्हणजे खरी भक्ति नव्हे, तर तो व्यापार होय! अशी त्यांची धारणा होती. संसारांतील प्रत्येक जण व्यापारी वृत्तीनेच जीवन जगत असतो. परमेश्वराची भक्तिसुद्धा तो फळाच्या आशेनेच करीत असतो. परंतु भगवंताचा अनन्य भक्त या व्यापारी वृत्तीने भक्ति न करता भगवंताच्या भेटीव्यतिरिक्त कोणत्याही फळाची आशा करीत नाही. ब्रह्मस्वरूप महामुनी कौंडिण्य हे भक्तिरसात पूर्णपणे तन्मय होऊन जात असत. सर्व ठिकाणी तो परमात्माच व्यापून राहिलेला आहे, अशी त्यांची दृढ धारणा असल्यामुळे, ते सर्व ठिकाणी प्रेम दृष्टीने पहात – ते प्रेम मूर्ती होते.

संसार सागरातून पार पडून जाण्याच्या एकाच इच्छेने महात्मा कौंडिण्य मुनीच्या आश्रमांत अनेक संत, आत्मज्ञानी, मुमुक्षू, सतत येत असत, व त्या महात्मा कौंडिण्य मुनीच्या संगाने पवित्र होवून या संसार सागरातून पार पडून जात. **क्षण भंगुर सुख देणाऱ्या नाशिवंत वस्तुवर प्रेम करणे म्हणजे मूर्खपणा आहे. म्हणून सर्वांनी ब्रह्मनिष्ठ व्हावे ;** असा ते उपदेश करीत असत. मनुष्य जर क्षणभंगूर सुख देण्याच्या गोष्टींचेच स्मरण करीत राहीला तर त्या मनुष्याच्या भावना त्या क्षणैक सुख देणाऱ्या गोष्टींवर दृढ होतील व अशी दृढ झालेली भावना म्हणजेच वासना होय; मग ती वासना मलीन असो किंवा शुद्ध असो! ती जीवाच्या बंधनाला कारणभूत होणारच ! वासना ही सर्व जीवांना मोक्ष मार्गापासून दूर नेणारी असते म्हणून **मनुष्याने सर्व गोष्टींच्या त्यागापूर्वी वासनांचा त्याग केला पाहिजे.** भगवंताच्या प्रेमाला पात्र होण्यासाठी राग, लोभ, मोह, क्रोध, भय

यावर विजय प्राप्त करून खऱ्या प्रेमयुक्त अन्तःकरणाने भक्ति केली तरच त्या परमात्माच्या प्रेममय दिव्य अनुभूतिचा लाभ करून घेता येईल. शुद्ध वासनेमुळे परमेश्वराची परमपवित्र भक्ति प्राप्त होते, परंतु मलीन वासना शिल्लक राहिल्यातर निर्विकल्प ब्रह्माचा साक्षात्कार होण्यास प्रतिबंध होईल. म्हणून मनुष्याने परमेश्वराच्या भक्तित मग्न होवून सततच्या अभ्यासाने सर्व वासनांचा क्षय केला तरच आत्मस्वरुपाचे यथार्थ दर्शन होऊ शकेल.

महामुनी कौंडिण्य ऋषींनी सर्व वासनांचा क्षय केला होता. त्यामुळे ते सतत ब्रह्मरसांत मग्न असत, त्यांना पृथ्वीवरील सर्व पदार्थ ब्रह्मस्वरुप भासत असत. चित्तवृत्ती शुन्यतेमुळे ते सर्वत्र आत्मस्वरुपानेच पहात असत. अशा प्रकारे निर्वासनामय होवून फक्त अद्वैतानुभूतीत मग्न असणारे पवित्र कौंडिण्य ऋषी सुद्धां संसारी जनांच्या संबंधात राहिल्यामुळे जन्ममरणाच्या चक्रांत सापडले.

मुनीश्रेष्ठ कौंडिण्याच्या पवित्र आश्रमाच्या समोरच एका प्रसादतुल्य वाडयांत पूर्व जन्मातील कर्मामुळे या जन्मी भोग भोगण्यासाठी वेश्ये सारख्या अधम कुळांत जन्म घ्यावा लागलेली एक लावण्यवती वेशा रहात होती. ती वेश्या असूनही जन्माने प्राप्त झालेल्या धर्मापासून कधीही न-ढळतां परमेश्वराच्या भक्तित तल्लीन होऊन त्या करूणामय भगवंताच्या गुणांचे वर्णन गाण्यातच स्वतःला धन्य मानीत असे. तीचे आराध्य दैवत जो भगवंत त्याच्यावाचून ती एक क्षण सुद्धा दुसऱ्या कोणाचेही चिंतन करीत नसे. तीच्या लावण्यांची किर्ती ऐकून, नगरांतील सर्व थरांतील, जे संसारी इंद्रियजन्य सुखाचे लोभी लोक होते, ते तीच्याकडे नेहमी येत असत; प्रारब्ध कर्मानुसार प्राप्त झालेल्या वेशाधर्माप्रमाणे ती आपल्या उदरनिर्वासाठी मनाच्या विरुद्ध असूनही तीच्याकडे येणाऱ्या लोकाजवळ वेश्येप्रमाणेच वागत असे. परंतु तीचे मन परमेश्वराच्या भक्तित तल्लीन असल्यामुळे तीची सर्व कर्मे ब्रह्मार्पण बुद्धीने होत असत; व ती जे कर्म करीत होती, त्यावर तीची थोडीसुद्धा आसक्ति नव्हती, म्हणून ती वेश्येच्या कर्मात केव्हाच गुरफटून गेली नाही. तीच्या ठिकाणी विवेक आणि वैराग्य पूर्णपणे नांदत होते. त्यामुळे ती कामाने व मनाने आसक्तिरहित होवून, सर्व कर्मे योगक्षमाच्या निर्वाहासाठी भगवंताच्या नित्य स्मरणांत राहूनच करीत असे. तीच्याकडे येणाऱ्या लोकांपैकी अनेकांच्या ही गोष्ट लक्षांत आली होती.

कौंडिण्य मुनींच्या पवित्र आश्रमाजवळूनच त्या वेश्येच्या महाली जाण्याचा रस्ता असल्यामुळे, सहाजिकच कौंडिण्यमुनींची दृष्टी त्या वेश्येच्या महाली जाणाऱ्या लोकांवर पडत असे. ज्या ज्या वेळी कोणी तीच्या महाली जातांना दिसत असे; त्या त्या वेळी त्या दयाळू, प्रेममूर्ती, ब्रह्मनिष्ठ मुनीच्या मनांत पापाचे माहेरघर असलेल्या वेश्येच्या घरात जाऊन, क्षणैक इंद्रिय-सुख भोगून, पापकर्मामुळे पुढे होणाऱ्या अनंत नरक यातना त्या जीवांना भोगाव्या लागतील, म्हणून खेद उत्पन्न होत असे; त्या मुनीश्रेष्ठाचे असे दयाळू अन्तःकरण असल्यामुळे त्या वेश्येकडे जाणाऱ्या लोकांचा संतापही येत असे. **त्या ऋषीचा संताप जरी पवित्र होता तरीसुद्धा असा संतापही मनुष्याच्या आध्यात्मिक पतनाला कारण ठरून बंधनात पाडतो.** अशा सतत होणाऱ्या संतापामुळे महाज्ञानी ऋषी कौंडिण्य बंधनात पडत गेले. ब्रह्मनिष्ठ तत्त्वज्ञानी, भक्तश्रेष्ठ भगवंताच्या सतत अनुसंधानात असणाऱ्या, या ऋषीश्वराचे भगवंताचे अनुसंधान सुटून वेश्येकडे जाणाऱ्या लोकांचे कल्याण कसे होईल; याचे अनुसंधान होवू लागले. एवढे महाज्ञानी, ज्याने संपूर्ण कामनेपासून मुक्तता करून घेतली होती जो संपूर्ण दैवी कलांचा भोक्ता होता. ज्याने सर्व तृष्णेचा नाश केला होता; त्याचप्रमाणे ज्याने वासनांचा संपूर्ण क्षय केला होता, असे ते महाज्ञानी ऋषी आपल्या अन्तःकाळी वेश्येकडे जाणाऱ्या लोकांचे कल्याण कसे होईल; त्यांचा उद्धार व्हावा याचा विचार करीत होते. या आपल्या अन्तःकाळीच्या व्यवहारीक वासनेने, ईश्वराचे अनुसंधान सुटल्यामुळे ते पुन्हा जन्माला आले. त्या महान ऋषी कौंडिण्यांनी देह त्याग केल्यानंतर श्रद्धा, भक्ति व सदाचार यांनी संपन्न असलेल्या एका पवित्र कुलांत पुन्हा जन्म घेतला. पूर्व जन्मांत कौंडिण्यमुनी जीवनमुक्त, ब्रह्मनिष्ठ योगी असल्यामुळे व त्यांच्या ठिकाणी संपूर्ण वैराग्य प्राप्त

झाले असल्यामुळे जन्माला येताक्षणींच त्यांना पूर्व-जन्माचे ज्ञान प्राप्त झाले. अन्तःकाळी झालेल्या वासनेमुळे आपल्याला ह्या देहधारण करावा लागला याबद्दल ते अत्यंत दुःखी झाले; त्यांनी मनाशी पक्का निश्चय केला, कि या जन्मात संसारापासून विरक्त राहून प्रारब्ध कर्मानुसारं जो पर्यन्त हा देह राहिल तो पर्यंत ब्रह्मचिंतनातच जीवन घालवावे, अशा तऱ्हेच्या निर्णय घेतलेले ते पूर्वजन्मीचे ऋषीश्वर जन्मल्यापासूनच तोंडातून कोणत्याही तऱ्हेचा स्वर न काढता व आईचे स्तनपानही वर्ज्य करून राहू लागले. अत्यंत सुंदर व तेजस्वी, सुदृढ असलेल्या आपल्या बालकाच्या या कृतींमुळे आईवडिलांना अत्यंत काळजी निर्माण झाली. दूधही पीत नाही व रडतही नाही, हे पाहून त्यांच्या जीवाची कालवाकालव होवू लागली व जस जसे दिवस जावू लागले तस तसे ते अधिकच चिंतातूर होवू लागले. मूल रडत नाही व दूधही पीत नाही तरीही तो वाढतो आहे, ही गोष्ट त्या नगरांत पसरायला वेळ लागला नाही. हे सर्व जग अन्नमय असल्यामुळे अन्नाशिवाय कोणताही प्राणी जीवंत राहू शकत नाही. योगीसुद्धा देहाचे पोषण होण्यासाठी कंदमुळाचा आहार घेतात, असे असतांना सुद्धा हा बालक जन्मापासूनच अन्नपाणी वर्ज्य करून मूकअवस्थेत रहात आहे. तेव्हा यामध्ये काही गूढ असले पाहिजे, अशी चर्चा त्या नगरांत सर्वत्र होऊ लागली. ते बालक परमेश्वरी अवतार असले पाहिजे, असे मानून त्याच्या दर्शनासाठी त्या नगरांतील व आजूबाजूच्या नगरांतील लोक रांगा लावून त्याचे दर्शन घेवू लागले. एके दिवशी ती वेश्या बालकाच्या दर्शनाला गेली. त्या बालकाचे अत्यंत तेजःपुंज स्वरुप पाहिल्याबरोबर त्या ज्ञानी स्त्रीयेला आपल्या व बालयोग्याच्या पूर्व जन्माचे स्मरण होऊन आपल्याकडे येणाऱ्या लोकांना पाहून त्यांना जो तिरस्कार वाटे, त्याच चिंतनात त्या महात्मा योग्याचे देहावसान झाल्यामुळे वासनेच्या प्राबल्याने त्याला पुन्हा जन्माला यावे लागले; अशा तऱ्हेच्या कर्माच्या बिचित्र गतीचे तिला ज्ञान झाले.

(अपूर्ण पुढील अंकी)

## ० चारमार्ग ०

संग्रहाक : **रमेश ढोले**

जीवनयात्रेचा हा शेवटचा टप्पा गाठण्याकरिता ज्या साधना सांगितलेल्या आहेत त्याच निरनिराळ्या योगसाधना होत मानवत्वापासून देवत्वापर्यंतचे निद्य दुःखापासून निःशब्द आनंदप्राप्तीपर्यंतचे हे अंतिम स्थित्यंतर साध्य करून घेण्याकरितां हिंदुधर्मामध्ये आपणास निरनिराळ्या डावपेचांच्या चार पद्धती सांगितल्या आहेत. हे चार मार्ग म्हणजे 'भक्ति' 'ज्ञान' 'कर्म' आणि 'हठ' – आणि ते एकमेकां विरूद्ध नसून एकमेकांस मारकही नव्हेत. उलट ते सर्व एकाच आणि त्याच ध्येयाप्रत पोहोचतात.

स्वामी चिन्मयानंद

## – जीवनगीत –

उन्हाळ्यानंतर येतो पावसाळा ।
नको करू कंटाळा जीवनाचा ॥१॥

शरदाचे मागे धावे तो वसंत ।
गीत गात गात जीवनाचे ॥२॥

कधी पतझड कधी हा फुलोरा ।
जीवनाचा सारा वृत्तांत हा ॥३॥

मिसळून जाणे तयाच्याच सवे ।
गावे गीत नवे जीवनाचे ॥४॥

– विश्वंभर